अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com

। बुधवार, दि. २५ सप्टेंबर २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ३५६ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## पितृपंधरवडा जाऊ द्या; त्यानंतर निर्णय घेऊ



✔ **इंदापूर** : राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष तथा भाजप नेते हर्षवर्धन पाटील यांनी पितृपंधरवड्यानंतर मोठा निर्णय घेण्याचे स्पष्ट संकेत नीरा भीमा सहकारी साखर कारखान्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत दिले आहेत. एवढा पितृपंधरवडा जाऊ द्या त्यानंतर निर्णय घेऊ असे पाटील यांनी म्हटले आहे. विधानसभेची आगामी निवडणूक इंदापूरमधून लढविण्याचे सूतोवाच हर्षवर्धन पाटील यांनी यापूर्वीच केले आहे. तसेच, त्यांनी शरद पवारांचीही दोन वेळा भेट घेतली आहे, त्यामुळे पितृपंधरवड्यानंतर हर्षवर्धन पाटील कोणता निर्णय घेणार, याची उत्सुकता राज्याला असणार आहे.




# मामांना मिळाली ताकत दीदी आल्या गोत्यात

## अजितदादांनी मोहोळप्रमाणे करमाळ्याचीही राजकीय दिशा बदलवली

✔ करमाळा/प्रतिनिधी

**उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या जनसन्मान यात्रेनिमित्त मंगळवारी जेऊर-करमाळा रस्त्यावरील झरेगाव येथे प्रचंड सभा झाली. मोहोळप्रमाणे दादांनी आपल्या वक्तव्यातून करमाळ्याची राजकीय दिशाच बदलवून टाकली. त्यामुळे विधानसभेसाठी इच्छुक असणाऱ्याचे धाबे दणाणले आहे.विद्यमान आमदार संजयमामा शिंदे यांना पुन्हा आमदार करा, त्यानंतर आदिनाथ आणि मकाई या दोनही साखर कारखान्यांना चांगले दिवस आणून दाखवतो, अशा शब्दात दादांनी करमाळ्याच्या जनतेला आवाहन केले. या कारखान्यांमध्ये बदल घडवून नाही आणला तर मी अजित पवार नावही सांगणार नाही, अशी भीष्मप्रतिज्ञाही त्यांनी बोलून दाखवली. आमदार करा म्हणून दादांनी एकीकडे संजयमामांना ताकत दिली असली तरी त्यातून विधानसभेची तयारी करत असलेल्या रश्मी बागल मात्र गोत्यात आल्या आहेत.**



आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने या तालुक्यात इच्छुकांच्या जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत.या तालुक्याने काँग्रेस पक्षाला अनेक वर्षे साथ दिली आहे पण अलिकडच्या राजकारणात गटा-तटाचे राजकारण शिरले आहे. त्यामुळे संजयमामा शिंदे, माजी आमदार नारायणआबा पाटील, दिग्विजय बागल, रश्मी बागल आणि माजी आमदार जयंवतराच जगताप यांच्या गटांभोवती करमाळ्याचे राजकारण फिरत आहे. नगरपालिका, दोन साखर कारखाने, पंचायत समिती, मार्केट कमिटी या संस्था राजकारणाच्या केंद्रबिंदू ठरल्या आहेत. करमाळा तालुक्याने आज शेती क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. उजनीच्या बॅकवॉटरचे वरदान लाभलेल्या या तालुक्याने लाल केळी उत्पादनात मोठी झेप घेतली आहे.

या तालुक्याचे नेतृत्व आमदार म्हणून संजयमामा शिंदे यांच्याकडे आहे.त्यांनी गतवेळेस अपक्ष म्हणून निवडणूक लढवली होती. त्यानंतर ते अजितदादा यांचे समर्थक बनले. राज्यातील सत्तेची समीकरणे पाहून करमाळ्यातील गट तटाचे नेते राजकिय पक्षांचा आश्रय ठरवत असतात. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठी फूट पडली. त्यामुळे अजितदादांची ताकत कोणाला मिळणार याकडे तालुक्याचे लक्ष लागून होते. झरेगावच्या सभेत दादांनी स्पष्ट निर्वाळा दिल्यामुळे संजयमामांचा हाती घड्याळ बांधून घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, असे मानले जाते.

करमाळा तालुक्यात आदिनाथ सहकारी साखर कारखाना उभा राहावा; म्हणून गोविंदबापू पाटील माझ्याकडे येत असत. मला सांगायचे आहे की, आदिनाथ कारखाना उभा राहिला पाहिजे. जोपर्यंत आदिनाथ कारखाना उभा राहत नाही; तोपर्यंत मी पायात चप्पल घालणार नाही, अशी त्यांनी प्रतिज्ञा केली होती. या आठवणीला उजाळा देवून अजितदादा पुढे म्हणाले की, तुम्ही म्हणजे करमाळ्याच्या जनतेने संजयमामांना करम ाळ्यान पुन्हा एकदा आमदार करा. करमाळा तालुक्यातील आदिनाथ आणि मकाई सहकारी साखर कारखान्याला चांगले दिवस आणून दिले नाही तर अजित पवार नाव सांगणार नाही, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तालुक्यातील जनतेला केले.या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष, खासदार सुनील तटकरे, आमदार बबनराव शिंदे, आमदार संजय शिंदे, राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षा रूपाली चाकणकर आदी उपस्थित होते

आदिनाथ सहकारी कारखान्याची आज काय अवस्था आहे. करमाळा तालुक्यातील आदिनाथ आणि मकाई हे दोन्ही साखर कारखाने बंद आहेत, अशा शब्दात व्यथा व्यक्त करून पवार पुढे म्हणाले, सोलापूर जिल्ह्यात महाराष्ट्रात सर्वाधिक साखर कारखाने आहेत. उजनी बॅक वॉटर परिसरात मोठ्या प्रमाणावर ऊस आहे. करमाळा तालुक्यातुन १० साखर कारखाने ऊस घेऊन जातात. अशा परिस्थितीत तालुक्यातील दोन्ही सहकारी साखर कारखाने बंद राहणे, हे शेतकऱ्यांसाठी तोट्याचे आहे.

### पवारांचा असाही विश्वास

माझ्या बारामती तालुक्यातील माळेगाव आणि सोमेश्वर हे दोन सहकारी साखर कारखाने आहेत. हे दोन्ही साखर कारखाने उसाला महाराष्ट्रात एक नंबरचा भाव देतात. माळेगाव सहकारी साखर कारखान्याने ३६३६ रुपये, तर सोमेश्वर सहकारी साखर कारखाना ३५७१ रुपये भाव देतो. तुम्ही म्हणाल की 'मग अंबालिका कारखाना का एवढा भाव देत नाही. अंबालिकावर सध्या कर्ज आहे. ते कर्ज एकदाचे फिटू द्या. मग अंबालिका कारखानाही एक नंबरचा भाव देईल, असा विश्वास अजित पवार यांनी बोलून दाखवला.

### दीदींची होणार गोची...

अजितदादांनी संजयमामांच्या पाठिशी ताकत उभी केल्याने मकाई कारखान्याच्या माजी अध्यक्षा रश्मीदीदी बागल यांची गोची होण्याचे संकेत आहेत. संजयमामा हे अपक्ष म्हणूनच निवडणूक लढवण्याच्या तयारीत होते तर तिकडे दीदी ह्या भाजपकडून लढण्याची तयारी चालवली होती.पण महायुतीमधून करमाळ्याची जागा कुणाच्या पारड्यात जाणार हे अजून तरी स्पष्ट झालेले नाही.यदाकदा अजित पवार गटाला सुटली तर दीदींची भूमिका काय राहाणार याची उत्सुकता या तालुक्याला लागून आहे.

## एन्काऊंटर की कट? सीआयडी करणार तपास

✔ **मुंबई** : बदलापूरमधील शाळेत दोन चिमुकल्या मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणातील मुख्य आरोपी अक्षय शिंदे याचा याचा पोलिसांशी झालेल्या चकमकीत मृत्यू झाल्यानंतर राज्यातील राजकिय वातावरण भलतेच तापले आहे. अशातच या प्रकरणाचा तपास आता गुन्हे अन्वेषण विभाग अर्थात सीआयडी करणार असल्याची माहिती समोर आली आहे.

अधिकाऱ्यांनी मंगळवार सांगितले की, फॉरेन्सिक तज्ञांच्या पथकाने पोलीस वाहनाची तपासणी केली. ज्यात शिंदेने पोलिसांवर गोळीबार केला, त्यावेळी पोलिसांनी स्वसंरक्षणासाठी सोमवारी संध्याकाळी एका पोलिसाने गोळी झाडली. सोमवारी संध्याकाळी अक्षय शिंदेला त्याच्या पत्नीने नोंदवलेल्या दुसऱ्या गुन्ह्याच्या तपासासंदर्भात पोलीस वाहनात नेले जात असताना, त्याने एका पोलिसाचे रिव्हॉल्व्हर घेतले आणि गोळीबार केला. प्रत्यत्तरादाखल पोलिसांनीही गोळीबार केला, परिणामी त्याचा मृत्यू झाला.

### पोलिस कोठडीतील मृत्यूशी संबंधित प्रकरण

ही घटना पोलीस कोठडीतील मृत्यूशी संबंधित असल्याने त्याचा तपास महाराष्ट्र सीआयडी करणार असल्याचे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले. घटनेच्या वेळी वाहनात उपस्थित असलेल्या पोलिसांचे जबाबही ते नोंदवणार आहेत. अक्षयच्या आई-वडिलांचेही जबाब सीआयडी अधिकारी घेणार आहेत.

### मनसेकडून बक्षीस आणि समर्थन

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे यांनी अक्षचे एन्काऊंटर करणाऱ्या पोलिसांना ५१ हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. पैसे महत्वाचे नाहीत पण याचे उत्तर असेच दिले पाहिजे, असे मनसे नेते अविनाश जाधव यांनी सांगितले तसेच, जे झाले ते योग्य झालं. मी याआधीच म्हटले होते. आमचे सरकार असते तर थेट एन्काऊंटर केले असते. त्याामुळे झालेल्या घटनेचे आम्ही समर्थन करतो, असेही ही जाधव म्हणाले.

### तुडवून मारायला पाहिजे होते; एन्काऊंटरनंतर उदयनराजे संतप्त

साताऱ्याचे खासदार उदयनराजे भोसले यांनी याबाबत आपली बेधडक भूमिका मांडली आहे. अशा गुन्हेगारांना गोळ्या घालण्यापेक्षा लोकांच्यात सोडून तुडवून मारले पाहिजे, असे खा. उदयनराजे म्हणाले. सत्ताधारी विरोधक मला काही घेणदेणे नाही. जे कोणी असू दे यांच्या कुटुंबासोबत हा प्रसंग घडला असता तर काय केले असते? बोलले असते का? अत्याचार झालेल्या मुलीच्या कुटुंबाला ज्या परिस्थितीला सामोरे जावे लागते, त्या कुटुंबाच्या जागेवर मी स्वत:ला ठेवून मी बोलत असतो. गोळ्या घालून मारणे हे अतिशय सहज झाले. अशा लोकांना जनतेत सोडले पाहिजे. जनतेने त्यांना तुडवून मारले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणी काळात जी न्यायव्यवस्था होती, त्या प्रकारची न्यायव्यवस्था झाली पाहिजेत. बलात्कार केला की सरळ लोकांसमोर त्याला फाशी द्या, असे उदयनराजे म्हणाले.

## पावसाच्या पाण्यात अनोळखी तरुणाचा मृतदेह आढळला

✔ **सोलापूर** : पावसाने साचलेल्या पाण्यात एका ३५ वर्षीय अनोळखी इसमाचा मृतदेह तरंगताना आढळून आला. ही घटना अक्कलकोट रोडवरील महालक्ष्मी मंदिराजवळ मंगळवारी सकाळी उघडकीस आली.

अक्कलकोट रोडवरील महालक्ष्मी मंदिराजवळ पावसाचे पाणी साचले आहे. त्या डबक्यात एक अनोळखी तरुणाचा मृतदेह तरंगताना आढळून आला. एमआयडीसीच्या पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शासकीय रुणालाकडे पाठवून दिला. तपास हवालदार शिंदे करीत आहेत.



## बार्शी येथे सबजेल कर्मचाऱ्यास धक्काबुक्की

### दोघांवर शासकीय कामात अडथळा केल्याचा गुन्हा

✔ **सोलापूर** : आरोपीला भेटण्याच्या कारणावरून सब जेलमधील कर्मचाऱ्यास धक्काबुक्की करून शासकीय कामात अथळा निर्माण केल्याची घटना बार्शी तहसील कार्यालयाच्या आवारातील सबजेलमध्ये सोमवारी सायंकाळच्या सुमारास घडली. याप्रकरणी बार्शी शहरच्या पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या संदर्भात सबजेल मधील कर्मचारी संदीपकुमार भिकाजी नालपे (रा.बार्शी) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. सोमवारी सायंकाळच्या सुमारास संदीपकुमार नालपे आणि त्यांचे सहकारी साक्षांक चिखले हे दोघे सबजेल मधील कार्यालयात काम करीत होते. त्यावेळी तथागत मस्के (रा.भीमनगर बार्शी) आणि बबलू कसबे (रा.बाळेश्वर नाका, बार्शी) हे दोघे त्यांच्या कार्यालयात आले. आणि आरोपीला भेटण्याच्या कारणावरून त्यांना शिवीगाळ करून जेलच्या लोखंडी दरवाजावर हाताने मारत होते. त्यावेळी त्यांना अडवण्याचा प्रयत्न संदीप कुमार नालपे यांनी केला. तेव्हा दोघांनी त्यांना धक्काबुक्की आणि शिवीगाळ करीत शासकीय कामात अडथळा केला, असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक जाधव करीत आहेत.

## जल जीवनची कामे सुरू करा; अन्यथा कारवाई

### जलजीवनचे कार्यकारी अभियंता धनशेट्टी यांचा इशारा

✔ सोलापूर/प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या जल जीवन विभागाची जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात कामे सुरू आहेत. कामांचे बिले थकल्यामुळे कॉन्ट्रॅक्टर संघटनेने काम बंद आंदोलन सुरू केले असून आंदोलनाच्या आजच्या पाचवा दिवस आहे. ही कामे त्वरित सुरू करा अन्यथा कारवाई करण्यात येईल असा इशारा जलजीवनचे कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी यांनी दिला आहे.

जनजीवन मिशन योजर्नेतर्गत पाणीपुरवठा योजनेची कामे करताना विविध अडचणी येत आहेत याकडे लक्ष वेधण्यासाठी ग्रामीण पाणीपुरवठा कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनच्या वतीने काम बंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले होते.

मात्र कोणत्याही अडचणीचे निराकरण झाले नाही. त्यामुळे काम बंद आंदोलन सुरू करण्यात आले असल्याचे ठेकेदारांनी सांगितले. याबाबत जलजीवन मिशनचे कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी यांनी ठेकेदारांना चांगले चुनावले जल जीवन मिशनची कामे मंजूर करून ठेकेदारांना दिली आहेत. निधी अभावी कामे बंद करावीत, अशी तरतूद कुठेही नाह. अटी आणि शर्तीनुसार विविध कालावधीत कामे पूर्ण करणे आवश्यक आहे. त्वरित कामे सुरू न केल्यास कारवाई करण्यात येईल असे संजय धनशेट्टी यांनी म्हटले आहे.

## माहेरी आलेल्या बहिणीस भावाकडून मारहाण

✔ **सोलापूर** : माहेरी राहण्यासाठी आलेल्या ३० वर्षीय बहिणीस तिच्या भावाने लाकडी दांडक्याने मारून जखमी केले. ही घटना महातपूर (ता.माढा) येथे शुक्रवारी घडली. माया कुमार काळे (वय ३० रा.धानोरे ता. माढा) असे जखमीचे नाव आहे. ती महातपूर येथे माहेरी आली होती. त्यावेळी आमच्या घरी यायचे नाही असे म्हणत तिचा भाऊ रवी पवार (भाऊ) याने तिला दांडक्याने मारहाण केली. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




पावसाने तोंडचं 'पाणी' पळवलं!

कल्याण
459-82-200

मुंबई
337-37-269

## रमेश कदमांनी दुसऱ्यांदा घेतली पवारांची भेट

### मोहोळमधून 'तुतारी' घेत लढण्याचा निर्धार

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात वेगवान घडामोडी घडत आहेत. मोहोळचे माजी अमदार रमेश कदम यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची वाय.बी. चव्हाण सेंटर येथे जाऊन पुन्हा भेट घेतली आहे. मोहोळ मतदारसंघातून तुतारीच्या चिन्हावर निवडणूक लढविण्याचा निर्धार रमेश कदम यांनी केला आहे.**

रमेश कदम यांनी २०१४ मध्ये मोहोळमधून राष्ट्रवादीच्या चिन्हावर निवडणूक जिंकली होती. त्यानंतर कदम यांना अण्णाभाऊ साठे महामंडळातील गैरव्यवहार प्रकरणी अटक झाली होती. वर्षभरापूर्वी ते जामिनावर कारागृहातून बाहेर आले आहेत. दरम्यान, तुरुंगात असतानाही रमेश कदम यांनी २०१९ मध्ये विधानसभेची अपक्ष निवडणूक लढवली होती. त्यांना २४ हजाराच्या जवळपास मते मिळाली होती. आता पुन्हा एकदा रमेश कदम यांनी मोहोळ विधानसभेवर लक्ष केंद्रीत केले आहे. त्यांनी वाय. बी. चव्हाण सेंटर येथे जाऊन शरद पवार यांची भेट घेतली आहे. या भेटीत प्रामुख्याने मोहोळ विधानसभा मतदारसंघाबाबत चर्चा झाल्याचे कळते. माजी आमदार रमेश कदम आणि शरद पवार यांच्यातील भेटी महत्वाची मानली जात आहे.



### संजय क्षीरसागर यांचा मोठा अडसर

मोहोळमधील नेते संजय क्षीरसागर यांनी लोकसभा निवडणुकीत पवार गटात प्रवेश केला आहे. तेही विधानसभेसाठी इच्छुक आहेत. मोहोळमधून काँग्रेसला मताधिक्य मिळवण्यात आपलाही वाटा आहे, असे ते सांगत आहेत. त्यामुळे रमेश कदम यांना उमेदवारी मिळण्यात संजय क्षीरसागर यांचा मोठा अडसर आहे.

### महायुतीकडून आ. माने जवळपास निश्चित

मोहोळ मतदारसंघातून सध्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे यशवंत माने हे आमदार आहेत. आगामी निवडणुकीसाठी माजी आमदार राजन पाटील यांनी यशवंत माने यांची उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे यशवंत माने यांची उमेदवारी निश्चित आहे. आता महाविकास आघाडीचा उमेदवार कोण असणार याची उत्सुकता आहे.

### लोकसभेला दिला होता भाजपला पाठिंबा

माजी आमदार रमेश कदम यांनी लोकसभा निवडणूक लढविण्याची तयारी केली होती. ते एमआयएमकडून निवडणूक लढतील, अशी शक्यता निर्माण झाली होती. मात्र एमआयएमने सोलापूर मतदारसंघात उमेदवार न देण्याचा निर्णय घेतला, त्यामुळे कदम यांनीही लोकसभा निवडणूक लढविण्याचा निर्णय बदलला होता. त्यांनी महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांना पाठिंबा दिला होता.